दिवशीं खेळलेल्या रंगाची कल्पना झाली नसती, म्हणून 'रंगपंचमीचा पोवाडा हें नांव कदाचित् दिले असावे. परंतु हा त्यांत एक दोषच आहे. पाडव्याला दरबार कां भरविला त्याचे कारण,

**पाटिल बाबा महादजी शिंदे पदवि अलीजा बहादर ।**
**महा मुत्सद्दी फडणिस नाना बृहस्पतीचा अवतार ॥**
**या दोघांनीं करुन मनसुबा बेत ठरविला रंगाचा ।**
**रंगमिषें मेळाच जमविला दख्खनच्या सरदारांचा ।**

कवीनी याप्रमाणे दिले आहे.

काव्याचा विषय ' **कथाही वर्णित बखरिंत वाचुन** ' कवीनीं घेतला आहे. पोवाडयाचे दोन भाग पाडले आहेत. पहिल्या भागांत पांच कडव्यांत, श्रीमंतानीं रहात्या ( शनवार )वाडयांत दरबार भरवून तेथून थाटाने स्वारी निघाली व ती वाडयाला उजवी घालून, रंग खेळत व गुलाल उधळीत बुधवार पेठ, रविवार पेठ, रास्त्यांची पेठ या रस्त्यानें वानवडीस महादजी शिंदे याचे गोटात गेली; तेथे दरबार भरून शिंद्याचा अहेर घेतला, रंग झाला, व हारतुरे घेऊन अस्तमानी शहराकडे मोर्चे फिरले, याचे रसभरित वर्णन दिले आहे जुन्या बखरी अलीकडे कोणी फारसे वाचीत नाहीं व त्या मिळतही नाहींत. परंतु अशा तऱ्हेचे छोटे काव्य वाचून मूळ बखरींत किती बहारीचे वर्णन असेल याची कल्पना होते. ' ये कांडे, होलार ' वाद्य वाजविणारे ) ' चिराफदानी ' वगैरे आतां लुप्त झालेले जुने शब्द माहीत होतात; त्या वेळेस प्रसिद्ध सरदार कोण होते त्यांची जंत्री मिळते; ब्राह्मणमराठ्यांत एकोपा किती होता तो पहाण्यास सांपडतो; अलीकडचे ' मर्द ' मराठे, ब्राह्मणांना ' भटें ' म्हणून हिणवितात परंतु त्यांचे महादजी शिंद्यासारखे दिलदार शूर पूर्वज त्याच 'भटां'पुढें ' **कर बांधुनिया दस्तीनें कुर्निसात** ' करीत असत व ते वरवर नसून प्रेमानें त्यांचे नेत्र

भरून येत असत हे दृश्यदिसते; उलट पक्षीं, पेशवे जरी येवढे सत्ताधीश होते तरी--

**छत्रपतीच्या नांवें मुजरा करून भगव्या झेंड्याला ।**
**सवाई माधव प्राण पुण्याचा धनि अंबारी मधें बसला ॥**

यावरून त्याच्या राजनिष्ठेची साक्ष पटते. एकंदर स्वारीचे वर्णन इतके सर्वांग-सुंदर झाले आहे कीं ते वाचीत असता प्रत्यक्ष स्वारीच आपण पहात आहोंत असा भास होतो.

दुसऱ्या भागांत म्हणजे शेवटच्या पांच कडव्यात त्याच पुण्याचा सद्यस्थितीचा तुलनात्मक विरोध कवीनीं वर्णिला आहे. सुरवातीलाच--

**कथाही वर्णित बखरिंत वाचुन पुणें पहाया मन हुरहुरलें ।**
**येथ येऊन पाहूं जातां तेंच चित्र बहु हिरमुसलें ॥**

असे म्हणून काय दिसले तर--

**हाय हाय रे ! हे दुर्दैवा ! शोचनीय ही स्थिती किती ।**
**ज्या शहरामधिं रंग उडाला तेथ उडे सांप्रत माती ॥**
**विप्र मराठे ज्या शहरींचे एक ही ख्याती दूरवर .**
**होती; तेची बसूं लागले परस्परांच्या उरावर ॥**
**मावळलें शौर्य पोकळ वाद माजला ।**
**सर्वत्र पुस्तकीं ज्ञानासी पूर आला ॥**
**दरबाराचें नांव कशाला फुकट सभा त्या बहु होती ।**
**नित्य लेखण्या व्यर्थ पाजळुनि ठवळ्यावर काळें करिती ॥**
**मर्दुमकी ती मागें सरली, समाज झाला बहु दुबळा ।**
**द्वेष घुशीनें पोखरला कीं एकीचा सौख्यद किल्ला ॥**

पुण्याचे हल्लींचे हे वर्णन अयथार्थ कोण म्हणेल ? सर्व गांवभर, पावसाळ्या-शिवाय खंडोगणती धूळ तर उडत असतेच; पावसाळ्यात धूळ बसली तर त्याच प्रमाणांत चिखलाचा रस्तोरस्तीं राडा असतो ब्राह्मण व सत्यशोधक यांच्या पराक्रमाचा डंका सर्व ब्रह्मांडात दुमदुमत आहेच. परिषदा, सभा व पोकळ शुष्कवाद यांत तर पुणे कोणालाच हार जाणार नाहीं. मर्दुमकीचा लवलेशही कोठे दिसत नाहीं ना ीं म्हणावयाला एकमेकाचे पाय धरून मागे खेचण्यांत केव्हां केव्हा मर्दुमकीची थोडी झाक दिसते. गावात वर्तमानपत्रे बरींच आहेत व ढवळ्यावर काळे करण्यांत त्यांच्या लेखण्या नित्य व्यर्थ पाजळल्या जात आहेतच.

पूर्वार्धांतील स्वारीशीं हल्लींच्या स्वाऱ्याचा तुलनात्मक मजेदार विरोध उत्तरार्धांत दाखविला आहे, तो कवीच्या शब्दांतच देऊं.

**इतक्या मध्यें बातमि आली धनि सांप्रतचे येणार।**
**आज दुपारीं लाट गव्हर्नर बुधवारांतुनि जाणार॥**

**म्हणुनि धन्याला पाहण्या गेलों तों तेथे कांहींच नाहीं।**
**नाकेबंदी जिकडे तिकडे जणुं हरताळ पडली काई॥**

**वाजुं लागल्या शिट्या शिट्यांवर, काळे पोलिस चौफेर।**
**चामकराचे मुजरे होतां धांवत आली मोटार॥**

**नृप दर्शन--लालसा नगावर मम बुद्धि होतो चढली।**
**ती पोलिसनें ओढुनि मागे उलट मुखामधिं भडकविली॥**

**बरें र आपला दुरुन पाहतों धनी तेवढा मज दावा।**
**तोही म्हणे, मज ठाऊक नाहीं कुठुन तुला मग सांगावा॥**

**माटारि मधिं ते दोन तीन पाहिले।**
**बसलेले फिरंगी लाट नाहीं उमगले**

ते आगगाडीचे गार्ड मला वाटले ।
येणार धनी असतील मागुनि भले ॥
परि कळलें कीं त्यांतच होते लाट गव्हर्नर धनि अपुले ।
हाय हायरे ! हें दुर्दैवा ! धनी असे कां आम्हां दिले ॥

आधींच हिरमुसलेले मन व त्यात पोलीस शिपाईबुवानीं श्रीमुखांत भडकावलेली तेव्हा साहाजिकच परमेश्वराची आठवण झाली व पडला तर तोच उपयोगी पडणार तेव्हां—

आतां विठोबा ! तुला विनंति ही अमुची जोडून कर ।
भरतभूमिचा झणीं करावा चहुं मुलखी जयजयकार ॥
फिर्याद कराया स्थल देवा ! तुजविना ।
नाहींच आम्हांला उरलें सच्चिद्घना ॥
तूं सर्वशक्ति जगचालक मनमोहना ।
करिं दयार्द्र अमुच्याविषयीं नृपती—मना ॥
पूर्वींच्या कविपरी भाग्य मदिय खचित ना ।

कसे ? तर—

फंदि प्रभाकर जोशिबुवांनीं स्वराज्य रंगासी लुटिलें ॥
दास गणूला परवशतेच्या बेरंगा बघणे आलें ।

एकंदर पोवाडा फार रसभरित आहे. काव्याच्या दृष्टीने ऱ्हस्वदीर्घाच्या चुका आहेत, परंतु हा पोवाडा आहे व शाहिराला त्या क्षम्य आहेत.

**श्रीदासबोध**—मासिक संपादक-शंकर धोंडो क्षीरसागर, श्रीदासबोध-कार्यालय, ब्रह्मचर्याश्रम, मसूर, जि सातारा. वार्षिक वर्गणी रु.२ आ. १८ हें मासिक श्रीविनायक महाराज मसूरकर यांनीं मसूर येथे स्थापिलेल्या ब्रह्मचर्य

श्रम संस्थेमार्फत निघूं लागले आहे. उद्योग फार स्तुत्य आहे. श्रीसमर्थांचा दासबोध व संप्रदाय यांचे जितकें विशदीकरण होईल तेवढे पाहिजेत आहे. अभिप्राय व परतभेटींकरिता अंक पाठविल्याबद्दल संपादकांचे आम्हीं आभारी आहोंत. श्रीसाईलीला परतभेट देणारच.

विस्तृत अभिप्राय पुढे देऊं.

**विद्यासेवकः**—या मासिकाचा अंक पाठविल्याबद्दल संपादकाचे आभारी आहोंत.

# श्री शिर्डी संस्थानचें हल्लींचें कार्यकारी मंडळ.

अध्यक्ष

## ह. भ. प. दासगणू महाराज

सभासद

रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी. ए., एल्.एल्., बी. जे. पी.
श्रीयुत लक्ष्मण गणेश ऊर्फ काकासाहेब महाजनी
प्रो. गणपतराव जी. नरके एम. ए., एम.एस.सी.
श्रीयुत रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड
श्रीयुत तात्याबा गणपत कोते पाटील
} संस्थानचे तहहयात ट्रस्टी

श्रीमंत केशवरावसाहेब गोपाळ बुटी
श्रीयुत बाळकृष्ण विश्वनाथ ऊर्फ बाळासाहेब देव बी. ए. मॅजिस्ट्रेट
श्रीयुत यशवंत जनार्दन गाळवणकर बी. ए.
श्रीयुत मेघश्याम बी. ऊर्फ बाळासाहेब रेगे बी. ए., एलएल बी.
श्रीयुत माधवराव बळवंत देशपांडे

चिटणीस

श्रीयुत गोविंद काशीनाथ ऊर्फ अप्पासाहेब गाडगीळ बी. ए. बॅरिस्टर

दुय्यम चिटणीस

श्रीयुत रामचंद्र दादा कोते पाटील

खजिनदार

श्रीयुत गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर रिटायर्ड मॅजिस्ट्रेट

दुय्यम खजिनदार

श्रीयुत रघवीर भास्कर पुरंदरे

## भक्तमंडळाचे सभासद

### आयश्रदाते

श्रीमत केशवराव गोपाळ बुटी
,, पूर्णचंद्र गोपाळ बुटी
,, मोतीलाल माणिकचंद ऊर्फ प्रतापशेट
,, मगनलाल नथुराम दवे
शेट महमद व आमद
,, विठ्ठलदास राघवजी ठक्कर
,, मुसाहाजी अल्ली खत्री
,, माणिकलाल. एल्. मेहता
श्रीयुत व्यंकटेश बळवंत पेढारकर
,, श्रीराम सदाशिव तांबे
,, कृष्णाजी नारायण आगाशे

### सन्मान्य सभासद

ह० भ० प० गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज

### तहाहयात वर्गणीदार

रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान
रा. रा. सदाशिव सीताराम दीक्षित
,, लक्ष्मण गणेश महाजनी
डॉक्टर कॅप्टन् व्ही. जी. हाटे
श्रीमती पार्वतीबाई ओझारकर
,, जानकीबाई सीताराम घटे
रा. रा. दाजी विठ्ठल सांभारे
मि. जेरू. जे. निकालावसोज
डॉक्टर केशरीनाथ वासुदेव सावे
रा. रा. मोरेश्वर नारायण सावे
,, रामचंद्र सखाराम खानोलकर
,, केसू नाना करदीकर
प्रोफेसर गणपतराव जी. नरके
रा. रा. हरि केशव कर्णिक
,, लाला लखमीचंद
,, जयशंकर हरजीवन मेथा
,, सुंदरराव दीनानाथ नवलकर
,, निळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे
रा. रा. गजानन शिवराम पाटणकर
,, बाळकृष्ण विश्वनाथ देव
,, यशवंत जनार्दन गाळवणकर
,, गोविंद रघुनाथ दाभोळकर
,, जीवनराव बाळकृष्ण कोठारी
,, रामचंद्र वामन पाटणकर
,, आनंदजी हीरजी कुंभार
रा. सा. धोंडू विष्णु परुळकर
रा. रा. रामकृष्ण जनार्दन करदीकर
श्री. रमाबाई कामत
शेट जमनादास हरकचंद
मि. जाव अतोन परेरा
रा. रा. दामोदर रामकृष्ण बापट
,, त्रिंबक आनंदराव कर्णीक
,, रघुवीर भास्कर पुरंदरे
,, वासुदेव नारायण चांदोरकर
शेट माधवजी झीणा ठक्कर
,, कृष्णलाल मनोर
,, रजबअल्ली महमद
,, हरेराम धरमसी
रा. रा. आनंदराव गणपतराव शितोळे
,, त्रिंबक गोविंद पाटील
रा. ब. सखाराम बळवंत धुमाळ
सौ. रखुमाबाई गोविंद दाभोळकर
प्रेसिडेंट कुर्ला अमेच्युअर नाटक क्लब
रा. रा. श्रीपाद बाळकृष्ण देव

### सामान्य वर्गणीदार

रा. रा. अंबाशंकर प्रभाशंकर भट
,, आनंदराव परशुराम डोळस
,, आत्माराम नथोबा जोशी
,, आनंदराव सुंदरजी नराधर
,, आबाजी मालोजी च्व्हाण
श्री. उद्धवेश बुवा

रा. रा. बाळा पिलाजी गुरव
,, भवान्या पोशा पाटील
,, बाळकृष्ण वामन वैद्य
,, बाळाजी गोविंद रासने
,, बाळकृष्ण केशव शेटे
,, बापूजी गोविंद पाटील
,, बाजीराव पांडुरंग मंडलोई
,, बाळकृष्ण राघो सावत
,, भिकाजी नारायण पंडित
,, बापू राघो बोरावके
,, बळवंत हरी कर्णीक
,, बयाजी आपा कोते
,, बाळकृष्ण गणेश दीक्षित
,, भास्करराव कोर्लेकर
,, चिंतामण नारायण सोनटक्के
,, चिंतोबा तंबाकूवाले
,, चिंतामण पर्शराम भिडे
,, दामोदर त्रिंबक नारगोळकर
रा. रा. द्वारकानाथ हरि देशमुख
,, देऊ हरशेट काळण
,, दामोदर सावळाराम रासने
,, दत्तात्रय सीताराम ओक
,, दत्तात्रय गोविंद परुळकर
मि. डी. एम्. राजा.
रा. रा. दिनकर मोरेश्वर पाटकर
,, दत्तात्रय नारायण परुळकर
,, धोंडू भिसाजी राऊळ
,, दिनकर अनंत शाळिग्राम
,, धोंडो मनोहर रत्नपारखी
,, गोविंद नारायण सामंत
,, गणेश शिवराम माटे
,, गोविंद काशीनाथ गाडगीळ
,, गोविंद लक्ष्मण पांढरे
,, गोपाळ दिनकर जोशी.

,, गजानन महादेव कोल्वणकर आणि कं.
,, गोविंद बळवत लघाटे
डॉक्टर गोपाळ रामचंद्र जोशी
रा. रा. गगाधर नारायण चौबळ
,, गगाधर भास्कर रांगणेकर
,, धी ऑनरेबल. गणेश श्रीकृष्ण खापर्डे
,, गोपाळ लक्ष्मण आपटे
,, गजानन दामोदर वर्तक
,, गणेश हरि वाटवे
,, गोविंदराव पांडुरंग वांद्रेकर
,, रायबहादूर, गोविंदराव मंडलोई
,, शेट गोविंददास सितारामदास कॉट्रॅक्टर
,, गोविंद नामाजी पाटील
,, गोविंद भास्कर चौबळ
,, गोपाळ रघुनाथ वांबर्डेकर
,, हरिश्चंद्र रामजी मेस्त्री
डॉ. हिरालाल बी. क्लार्क
मि. होर्मसजी कूपर
रा. रा. हरीभाऊ बी. शिरसाठे
,, हरीभाऊ रामचंद्र सामंत
,, हरि विश्वनाथ चौबळ
,, जनार्दन बाळकृष्ण आजगांवकर
,, जीवाजी कृष्ण परुळकर
,, जी. व्ही. प्रधान
,, डॉक्टर जी. के. राणे
रा. सा. कृष्णराव नारायण परुळकर
रा. रा. खंडेराव रामकृष्ण चोणकर
,, काशिनाथ शंकर दुबे
,, काळूराम गांग्रडे
सौ. लक्ष्मीबाई जी. गाडगीळ
रा. रा. मल्हार त्रिंबक महागांवकर
रावबहादूर एम्. बी. किनखेडे

रा. रा. मेघश्याम बी. रेगे
,, मोरेश्वर भास्कर प्रधान
,, मोरेश्वर महादेव कोलगडे
,, मधुकर डी. कीर्तने
मेहरबान एम्. इ. आर मलक
रा. रा. महादेव विठ्ठल दाते
रावबहादूर सरदार एम्. व्ही. किबे
रा. रा. मारुतीराव महादजी फड
,, मगेश मोरेश्वर पाटकर
,, नारायण जनार्दन तेंडुलकर
,, नरहर भास्कर दडवते
,, नारायण बापुराव शिरसाठे
,, नारायण नरसिंह फडणीस
,, नागेश आत्माराम सावत
,, पांडुरग विठ्ठल पाटील
,, पुरुषोत्तम रघुनाथ अवस्ती
,, पुरुषोत्तम चितामण रेगे
शेट पुरुषोत्तमदास गोपाळदास घडियाळी
डॉ. रुस्तमजी कुवरजी मेथा
रा. रा. रघुनाथ हरि वाटवे
,, रामकृष्णा श्रीकृष्णा नवलकर
,, रामचद्र सीताराम देव
श्रीमती राधाबाई डी. व्ही. कीर्तने
रा. रा. रामचंद्र आत्माराम तखंड
,, रामचद्र रामकृष्ण सामंत
,, रामचंद्र दादा पाटील कोते
,, रामचद्र बी. जुन्नरकर
,, शामराव आर. जयकर
,, सदाशिव बापुराव शिरसाठे
,, शामराव भास्कर कंटक
श्री० शांताबाई एन. ब्रह्मांडकर
रा. रा. शंकर भास्कर रांगणेकर
,, सत्यवान रामचंद्र मयेकर
,, शकर विष्णु भगवान
रा. रा. शकर गणपत शिंदे
,, शांताराम गोविंद परुळकर
,, श्रीराम निलकंठ चौबळ
श्री० सुलोचनाबाई वाकडे
रा. रा. शिवराम हरि मुळे
श्री० सरस्वतीबाई गोविंद सुडकोजी बोले
रा. रा. श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील
,, सदाशिव अप्पाजी मुणगेकर
,, श्रीनिवास बाळकृष्ण देव
,, शांताराम बळवत नाचणे
,, त्रिबक विठ्ठल गावड
,, त्रिंबक बळवत चित्रे
रा. रा. तात्या गणपत पाटील कोते
,, वासुदेव सीताराम सामत
,, व्ही. डब्ल्यू. राळे
,, वामनराव कृष्णराव औरगाबादकर
,, विश्वनाथ लक्ष्मण नुलकर
,, वामनराव प्राणगोविंद पटेल
,, वसंतराव नारायण गोरक्षकर
,, विठ्ठल जगन्नाथ खोत
,, वासुदेव सीताराम रातांजनकर
,, विठ्ठल केशव देसाई
,, वासुदेव अनत गोकर्णकर
,, विष्णु गंगाधर गाडगीळ
,, विनायक अप्पाजी वैद्य
,, वामन भिकाजी प्रधान
,, विनायक शकर गिरिधर
,, विनायक वासुदेव भडकमकर
,, विनायक यशवत प्रधान
,, वासुदेव विनायक साठे
,, वासुदेव महादेव कोलगडे
,, विष्णु बाळकृष्ण साने
,, यशवत बाळकृष्ण बोबडेकर
,, यशवत जगन्नाथ पडीत

# श्री शिर्डीसंस्थानाचे भक्तमंडळासंबंधीच नियम.

१ सदरील भक्त मंडळाचे सभासदांचे तीन वर्ग केले जातील ते येणें प्रमाणें.

( १ ) आश्रयदाते
( २ ) तहाहयात वर्गणीदार
( ३ ) सामान्य वर्गणीदार

२ ज्या भक्तांकडून ( " भक्त " शब्दांत पुरुष भक्त व स्त्री भक्त दोहोंचाही समावेश होतो असें समजावे ) संस्थानाचे कायम फंडांत पांचशें रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा अथवा पोस्टाचीं क्याश सर्टिफिकिटें अथवा म्युनिसिपल बॉंड अथवा पोर्ट ट्रस्ट बॉंड आले असतील त्याचा समावेश " आश्रयदाते " या वर्गांत होईल.

३ ज्या भक्तांकडून संस्थानाचे कायम फंडांत शंभर रुपये किंवा त्याहून अधिक ( पण पांचशेंहून कमी ) रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा अथवा म्युनिसिपल बॉंड अथवा पोर्ट ट्रस्ट बॉंड आले असतील त्यांचा समावेश " तहाहयात वर्गणीदार " या वर्गांत होईल.

४ ज्या भक्तांकडून संस्थानाचे कोठी फंडांत ( चालू खर्च फंडात ) सालीना पांच रुपये किंवा अधिक रक्कम येत असेल त्यांचा समावेश " सामान्य वर्गणीदार " या वर्गांत होईल.

५ ज्या सामान्य वर्गणीदारांकडून चालू साल खेरीज करून मागील सर्व वर्गणी आली असेल त्यांनाच सामान्य वर्गणीदाराचे हक्क प्राप्त होतील.

६ श्री शिर्डी संस्थान कमिटीसाठीं तीन तीन वर्षांनीं दहा सभासदांची निवडणूक व्हावयाची ती खालीं लिहिल्याप्रमाणें केली जाईल.

( १ ) दहापैकीं चार सभासद आश्रयदाते यांनीं भक्तमंडळाचे कोणत्याही सभासदांतून निवडावे.

) दहापैकीं तीन सभासद तहाहयात वर्गणीदार यांनीं भक्तमंडळाच्या कोणत्याही सभासदांतून निवडावे.

( ३ ) बाकी राहिलेले तीन सभासद सामान्य वर्गणीदार यांनीं भक्तमंडळाच्या कोणत्याही सभासदांतून निवडावे.

७ आश्रयदाते यांचेकडील निवडणूक झाल्या ंतर पंधरा दिवसांनीं तहाह्यात वर्गणीदार यांजकडील निवडणूक करण्यात यावी आणि त्यानंतर पंधरा दिवसानीं सामान्य वर्गणीदार याजकडील निवडणूक करण्यांत यावी. सर्व निवडणुकी लेखी मतपत्रद्वारां करण्यांत याव्या.

८ वर प्रमाणे दहा सभासदांची निवडणूक झाल्यावर ते व ट्रस्टी मिळून पंधराजणांची कमिटी होईल. त्या कमिटीने आपल्या पैकीं एकाला अध्यक्ष, एकाला चिटणीस व एकाला खजिनदार असे निवडावे. चिटणीसाने कमिटीच्या सभासदांपैकीं एकाला दुय्यम चिटणीस व खजीनदाराने कमिटीच्या सभासदांपैकीं एकाला दुय्यम खजीनदार नेमावे.

९ कमिटीच्या कोणत्याही सभासदाला एकापेक्षा अधिक हुद्यावर नेमूं नये.

पुण्यास रा. गोविंद लक्ष्मण पांढरे या नांवाचे महाराजांचे एक भक्त राहतात. त्यांच्या वाड्यांत शंकरराव आचारी या इसमाचे बिऱ्हाड आहे. शंकररावचे घरीं त्यांच्या नात्याची एक आजीबाई व तिची बहीण अशी राहत असतात. आजीबाईच्या दुसऱ्या एका बहिणीचा मुलगा गांवांत वेगळा राहतो. एके दिवशीं आजीबाई आळंदीला गेल्या होत्या व बहीण देवदर्शनाला गेली होती; अशा संधीला तो मुलगा घरीं आला व घरांत कोणी नाहीं असें पाहून त्याने पेटी फोडून त्यातील सुमारे रु. २००० किंमतीचे दागिने लांबविले. चोरी उमगल्यावर शंकररावाने पोलिसांत वर्दी दिली; परंतु या इसमाजवळ इतके दागिने कोठले असणार अशा साशंकित दृष्टीने पोलीस त्या प्रकरणाकडे पाहूं लागले. त्याच वाड्यांत धोपटे या नांवाचा एक पोलीस शिपाई बिऱ्हाडाने राहतो. शंकररावाने त्याचे कानावर गोष्ट घातली. दोघे मिळून आजीबाईच्या भाचाचे घरीं गेले व तपास करितां मुद्देमाल गच्चीवर लपवून ठेवलेला सांपडला. पोलीसनें त्या मुलावर खटला भरला. तेव्हां मुलानें दागीने मला मावशीनें दिले असे सांगून, मावशीवर किटाळ आणले. शंकररावानें बाईची अब्रु जाते तेव्हां कसे करावें म्हणून काशीनाथ मामांचा सल्ला विचारला. मामांची अढळ भक्ति साईनाथ महाराजांवर. त्यांनीं शंकररावांना महाराजांची उदी दिली व सांगितले कीं, कोर्टांत जातांना उदी आपल्या व बाईच्या कपाळीं लावावी व थोडी आरोपी मुलाच्या अंगावर फुंकावी म्हणजे महाराजांचे कृपेने सर्व संकटाचें निवारण होईल. खटल्याच्या तारखेचे दिवशीं शंकररावाने त्याप्रमाणे केलें. मॅजिस्ट्रेट साहेबांना बाईची जबानी भरंवशालायक वाटून त्यांनीं तिला दोषमुक्त केली व मुलावर गुन्हा शाबीत धरून, त्याचे लहान वय व पहिलाच अपराध म्हणून त्याला शिक्षा देऊन रु. ५०० च्या जातमुचलक्यावर सोडून दिलें. शंकररावानें त्या प्रीत्यर्थ पुण्यांतील महाराजांची भक्तमंडळी बोलावून मोठा भंडारा केला. दोनशें पान झालें. संकटसमयीं निश्चल भाव असल्यास महाराजांच्या उदीनें संकट निवारण होतें.

**काशिनाथ मामा दुबे.**

* * *

नागपूर कडील आमचे एक स्नेही एम् ए. झाले व पुढे तीन वर्षे विलायतेस राहून उच्च शास्त्रीय शिक्षण संपादून आले परंतु हिंदुस्थानांत त्यांच्या त्या उच्च शास्त्रीय शिक्षणाला कोठें वाव मिळेना. कलकत्याकडे, ब्रह्मदेशांत एक दोन वेळां त्यांना हंगामी काम मिळालें, पण कायमचा जम कोठे बसेना. ते रिकामे असल्यामुळें शिर्डीस राहात असलेल्या आपल्या नातेवाईकाकडे गेले. हळू हळू त्यांना महाराजांची योग्यता कळली व ते महाराजाचे पूर्ण भक्त बनले. त्यांचा मुक्काम शिरडीस सुमारे ६ महिने झाला. महाराजाचाही त्यांचेवर लोभ जडला. याच सुमारास महाराजांनीं दुपारीं भिक्षा गोळा करून आणण्याचा एक नवीन उपक्रम केला व ही कामगिरी त्यांनीं या एम्. ए. गृहस्थावर सोंपविली. दोन प्रहरीं ५ घरीं महाराजांचे नांवाने भिक्षा मागावयाची व मिळेल ती भिक्षा महाराजापुढे आणून ठेवावयाची. याप्रमाणे कालक्रमण करीत असतांना त्याचे मन जरी शिर्डीस रमले होतें तरी त्यांना पुढें आपले कसे होणार ही काळजी जाचीतच होती. कोठे आपल्या लायक काम किंवा नोकरी आढळून आल्यास ते अर्ज पाठवीत असत. शेवटीं बनारस कॉलेजमधून त्यांच्या अर्जाला उत्तर आले व त्यांत ३०० रु. पगाराची अध्यापकाची जागा त्यांना देऊं केली. शिरस्त्याप्रमाणें त्या गृहस्थानीं ती गोष्ट महाराजांचे कानावर घातली व महाराजाची परवानगी मागितली. महाराजांनीं त्यावर दिलेले उत्तर ऐकून मात्र त्याना आश्चर्य वाटले व थोडी निराशाही झाली. महाराज म्हणाले---काशीला आपले काय आहे ? आपल्याला पुणें-साताऱ्याकडे जावयाचे आहे व तिकडे आपले काम होईल. त्या गृहस्थांनीं बनारसची जागा तर नाकारलीच परंतु पुणें-साताऱ्याचे कोडे त्यांना सुटेना. त्या प्रांतांत त्यांनीं मिळविलेल्या शास्त्रीय ज्ञानासंबंधीं कांहीं काम निघणे त्यांना अशक्य वाटले. अर्थात त्यांना ते अशक्य वाटले, परंतु परमेश्वरी योजना महाराजांना माहीत. महाराजांवर पूर्ण विश्वास असल्यामुळें ते स्वस्थ राहिले. आणखी कांहीं महिने गेले एक दिवस वर्तमानपत्रात त्यांचे वाचण्यांत असा मजकूर आला कीं, पुणे येथील शास्त्रीय सरकारीं कॉलेजांत, एक नवीन जागा निर्माण करण्यांत आली आहे व त्यांनीं अभ्यासलेल्या शास्त्रीय विषयांत पारंगत असा

लेल्या अध्यापकाची जरूर आहे. आमच्या स्नेह्याच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला व "आपल्याला पुणे-साताऱ्याकडे जावयाचे आहे" या महाराजांच्या बोलाची सत्यता पटली. रीतीप्रमाणे त्यानीं अर्ज पाठविला व दुसरीं वशील्याचीं तट्टे मागे पडून, आमच्या स्नेह्याला वशीला नसतां, त्याच्या गुणावर ती जागा मिळाली. हल्लीं त्याना रु. ६०० पगार आहे.

* * *

विंचूरचे एक ब्राह्मण कुटुंब सुमारें ६० वर्षांपूर्वी काशीस राहण्यास गेले. त्याचे बरोबर त्याचा सात वर्षांचा एक मुलगा होता. आईबाप निवर्तल्यावर तो मुलगा पोरका झाला तेव्हा त्याचा सांभाळ एका बैराग्याने केला. त्या बैराग्याने त्याला पुढे आपले बरोबर हिमालयात नेलें. बैराग्याला औषधी वनस्पति शोधून त्याच्या गुणधर्माचे विवेचन करण्याचा नाद होता. गुरूबरोबर या शिष्याचीही त्या दिशेने बरीच प्रगति झाली. पुढे कालांतरानं बैराग्यानें देह सोडला. या बाल ब्रह्मचाऱ्याचे मन तिकडेच रमले. त्याने वार्धक्य येईपर्यंत आपला सर्व काल हिमालयात व त्याच्या आसमंतांतील भागांत घालविला व पुष्कळशा वनौषधींचा शोध लावला. वार्धक्यावस्थेत दक्षिणेत परत येण्याची इच्छा होऊन ते विंचूरला परत आले. तपासाअंतीं तेथील आपले नातेवाईक दिवंगत झाल्याचें त्याना आढळून आले. हरिद्वारचे ब्रह्मचारी या नावाने ते स्वतःला ओळखवीत असत.

एका स्नेह्याचे मार्फत त्यांची व आमची मुंबईस ओळख झाली व पुढें ते मधून मधून आमचे घरीं येऊं लागले. लोकांना औषधी फुकट द्यावयाच्या हें त्यांचे ध्येय होते. आपला सर्व संग्रह लिहून काढावा व तो छापवून त्या पुस्तकाची एक एक प्रत प्रत्येक गांवीं एकाद्या प्रतिष्ठित घराण्यांत ठेऊन त्या औषधींचा उपयोग सर्वांना व्हावा अशी त्यांची मनीषा होती. पण ती जनतेच्या औदासिन्यामुळें पूर्ण झाली नाहीं. त्यानीं आपलीं कांहीं औषधें आपल्या स्नेही मंडळींना सांगितलीं आहेत व तीं हमखास गुणकारी आहे

असा आमचा अनुभव आहे. औषधांची विक्री करणार नाहीं अशा अटीवर ते औषधे सांगत असत.

आमच्या घरीं त्यांचे बरेच येणेजाणे असल्यामुळे त्यांना आमचे मार्फत श्री साई बाबांची माहिती होऊन त्यांना महाराजाबद्दल फार आदर वाटत असे. तासचे तास ते आमचेपासून महाराजाच्या हकीगती मोठ्या प्रेमाने ऐकत असत. त्यांना आम्हीं महाराजाचे दर्शनास चलण्याबद्दल विनंति केली होती, परंतु हिमालयातील बैरागी हे आपले गुरू होते तेव्हा दुसरीकडे मुद्दाम दर्शनास जाणे अनुचित आहे असे ते म्हणत.

एकदा ते करमाळ्यास एका गृहस्थाकडे औषध देण्याकरितां गेले होते. त्या वेळीं तेथे पटकीचा आजार असून एका सावकाराचा एकुलता एक मुलगा त्या रोगाने पछाडला होता. ब्रह्मचारी बुवा औषध देतात ही माहिती लागल्यावरून सावकारानें त्यांना बोलाविलें. मुलाची स्थिति पहाता त्याचा अंतकाळ समीप आलेला दिसला व आता माझ्या औषधाचा कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यांनीं सांगितले. त्यावर एक गृहस्थ म्हणाला, ही वैद्याची भाषा झाली. आपणास वैद्य म्हणून बोलाविले नाहीं. जर आपणाला या मुलाला बरा करतां येत नाहीं तर आपण हा ब्रह्मचाऱ्याचा वेष कशाला घेतला ? ( त्यांचा वेष हल्लीं महात्मा गांधी ज्या वेषात असतात तसा नेहमीं असे ) ब्रह्मचारी बुवांना तें बोलणें ऐकून वाईट वाटलें. व त्यांनीं थोडेसे चिडून भस्म मागितले व तें भस्म श्रीसाई बाबाचे स्मरण करून रोग्याचे तोंडांत घातले व अंगाला लावलें. हा मुलगा उठल्यावर १५ फकीर जेवायला घालण्याचा त्यांनीं मनांत संकल्प केला. परंतु मुलगा उठेल अशी त्यांना मुळींच उमेद नव्हती. दुसरे दिवशीं ते धारवाडकडे निघून गेले. सुमारे पंधरा दिवसांनीं ते परत येत असतां, स्टेशनवर गाडी थांबली. तेव्हां बाहेर एक मनुष्य हरिद्वारचे ब्रह्मचारी महाराज या नांवाने हांका मारीत होता. रात्रीची वेळ. आपल्याला येथें कोण व कां हांका मारतो असे वाटून त्यांनीं बाहेर पाहिलें, तो हांका मारणारा गृहस्थ

त्यांचे जवळ आला व सांगू लागला कीं, मी तुम्हालाच पाहतों आहे. करमाळ्याच्या अमक्या सावकाराचा मुलगा बरा झाला, तेव्हां म्हटल्याप्रमाणे तेवढे १५ फकीर जेऊं घाला. ब्रह्मचारी बुवांना हा निरोप ऐकून फार आश्चर्य वाटलें. त्याला कांहीं प्रश्न विचारणार तों गाडी चालू झाली व तो इसमही कोठें दिसेना. त्यांना फार चुटपुट लागली. स्वप्न पडले कीं खरेच आपल्याला कोणी भेटला ? आपल्या मनातील १५ फकीराचा संकल्प याला कसा कळला ? या गाडींत आपण आहोंत हे त्या इसमाला कसे कळले ? अशा तऱ्हेच्या शंकानीं त्याचे अंतःकरणांत काहूर उडवून दिलें. उजेडतां पुणे आले. तेथे त्याना उतरावयाचे होते. पुण्यास गेल्यावर प्रथम त्यानीं करमाळ्यास आपल्या स्नेह्याला पत्र लिहून त्या मुलासंबंधीं माहिती विचारली. मुलगा बरा होऊन आनंदांत आहे असा जबाब आला. त्यावरून ते करमाळ्यास पुन्हां गेले. सावकाराला त्यांच्या आगमनाची बातमी कळल्याबरोबर तो भेटीस आला. त्याला तर प्रत्यक्ष ते ईश्वरच वाटले. मुलाला बरे केल्याबद्दल कसे उतराई व्हावे म्हणून तो विचारूं लागला, तेव्हा फक्त १५ फकीर जेवायला घाला म्हणून त्यांनीं सांगितले.

*　　　*　　　*

आम्हीं एकदां सहकुटुंब श्री रामेश्वराचे यात्रेला निघालों. आमचे बरोबर आमचे एक स्नेही ( हेही महाराजांचे भक्त आहेत ) कुटुंबासह निघाले. आमच्या लहान मुलीला संभाळण्याकरितां आम्हीं बरोबर आमच्या मेहुणीला घेतलें होतें. पहिला मुक्काम मद्रासला केला. तेथे एका गुजराथी पेढीवर राहिलों. अर्थात तेथे घरच्याप्रमाणें सोंवळे थोडेच असणार ? आमच्या मेहुणीचे सोवळें फार. दोन तीन वेळां त्यांनीं कुरकुर केली. त्यांना आमचें कुटुंब म्हणालें "××बाई येथे बरीच चांगली व्यवस्था असून तुम्हीं कुरकुरतां मग शिर्डीस आलात तर तुमचे कसे होईल. तेथे तर सोवळ्या बायका बाबांच्या पायावर मस्तक ठेवतात व त्यांचा विटाळ मानीत नाहींत." त्यावर त्या उत्तरल्या "असे असेल तर तुमच्या साईबाबांना माझा येथूनच नमस्कार" संध्याकाळीं त्या बाईंना

जोरांत उसण भरली. ती इतकी कीं चोळलें शेकले तरी चैन पडेना व अंथरुणावरून हलवेना. दुसरे दिवशीं सकाळीं आम्हाला श्री रामेश्वरला जाण्याकरिता निघावयाचें. डबाही ' रिझर्व्ह ' केला होता. रात्रीं उतार पडेना तेव्हां आमच्या मेहुणीला मद्रासेसच ठेऊन आम्हीं पुढे जाण्याचे ठरविले. गुजराथी गृहस्थानीं आम्हीं परत येईपर्यंत त्यांची काळजी घेण्याचे कबूल केले. इतक्या लांब येऊन यात्रा घडत नाहीं याबद्दल त्याना व आम्हांलाही फार वाईट वाटलें. परंतु त्यांचाही इलाज नव्हता व आमचाही नव्हता. दोघी बहिणीना रात्रीं झोंप नाहीं. आमच्या कुटुंबाला दुपारचे बोलणे सहज आठवून ती आपल्या बहिणीला थट्टेनें म्हणाली " ××बाई तुम्हीं दुपारीं म्हणालांत ना कीं तुमच्या साईबाबाना माझा येथूनच नमस्कार, म्हणून तुम्हाला उसण भरली व तुमचे रामेश्वर चुकते आहे. साईबाबा हे देवच आहेत. त्यांना तुम्हीं येथूनच नमस्कार करतां तेव्हां दुसरा देव रामेश्वरही म्हणतो कीं, मलाही येथूनच नमस्कार कर." बोलणे थट्टेचे, पण ते त्याना पटले व त्याही कण्हत म्हणाल्या "माझी चूक झाली. मी बोलणे परत घेते, माफी मागते, व जर माझी उसण सकाळपर्यंत बरी झाली तर मी रामेश्वराहून परत गेल्यावर ताबडतोब शिर्डीस बावांच्या दर्शनाला जाईन." काहीं वेळाने बरे वाटूं लागलें व सकाळला त्यांचे दुखणें साफ बरें होऊन, आमच्या बरोबर त्याची रामेश्वरची यात्रा झाली. कोठें मद्रास व कोठे शिर्डी ! यावरून महाराजाचे सर्वसाक्षित्व दिसून येते. आमच्या मेहुणीने नवस फेडला हे सागणे नकोच.

**बाबांचा भक्त.**

संपादक **श्रीसाई लीला** यांस—

कृ. सा. न. वि वि. सोबत पाठविलेल्या माझ्या अनुभवांना आपल्या मासिकांत स्थळ द्याल अशी आशा आहे.

१ पहिल्याने ज्या वेळीं मी शिर्डीस बाबांच्या दर्शनास गेलें होतें त्या वेळीं त्यांनीं मला एक पावली ( चार आणे ) दिली. ती पावली मी फार जपून ठेवीत असे. ती पावली एका करंडयात घालून मी तिची नेहमीं पूजा करीत असे. एके दिवशीं असे झाले कीं, एका बाईकडून मी कांहीं नारळ विकत घेतले व त्यांचे पैसे चुकते केले. नंतर कांहीं वेळाने ज्या वेळीं मी त्या करंडयाची पूजा करण्यास गेले त्या वेळीं पाहिले तों करंडयांत पावली नव्हती. पावली गेलेली पाहातांच मला फार वाईट वाटले व मी बाबांचा सारखा धावा करूं लागले. ती नारळवाली आपले सर्व नारळ विकून आमच्या घरीं परत आली व मला म्हणूं लागली, “ बाई ही तुमची पूजलेली पावली परत घ्या व मला दुसरी द्या ” हे पाहून बाबांच्या लीलेचें मला आश्चर्य वाटलें.

२ सुमारे पांच वर्षांपूर्वीं आमच्या वडिलोपार्जित घरामध्ये आम्हीं बरींच वर्षें राहात होतों. एके दिवशीं रात्रीं मला स्वप्न पडलें कीं, मी स्फटिकाच्या पायरीवर उभी आहे. तिकडे बाबा भिक्षापात्र घेऊन आले व मला म्हणूं लागले कीं, ‘खालीं उतर’ नंतर मी जागी झाले. मला ते स्वप्न फारच चमत्कारिक वाटले. त्या स्वप्नाचा मला कांहींच अर्थ समजला नाहीं. इतक्यांत सकाळीं माझा मुलगा पुण्यास गेला होता तो परत आला व मला म्हणाला आपल्याला दुसऱ्या घरांत गेले पाहिजे. मी त्याला घर बदलण्याचें कारण विचारिले व त्याने मला तें सांगतांच मी त्याला रात्रीं पडलेले स्वप्न सांगितलें व नंतर आम्हीं दुसऱ्या जागेत राहाण्यास गेलों. पूर्वीं घडणाऱ्या गोष्टीची सूचना बाबांनीं आधींच देऊन ठेवली होती.

३ कांहीं वर्षांमागें माझा मुलगा फार आजारी होता, व त्यामुळें मी फार काळजींत असे. रोज रात्रीं मी निजण्यापूर्वीं बाबांची प्रार्थना करीत असे

एके दिवशीं मला स्वप्न पडलें कीं, 'तुझा मुलगा बरा आहे; तूं कशाला चिन्ता करित्येस' त्या दिवसापासून माझ्या मुलाला आराम पडूं लागला व कांहीं दिवसानें तो साफ बरा झाला.

४ तिसऱ्या खेपेस मी शिर्डीस गेले होते त्या वेळीं दर्शनास जातांना मी एक रुपया कमरेस ठेविला होता व एक हातात घेतला. मी त्यांच्या पायां पडले व हातांतील रुपया त्यांस दिला. तो रुपया घेऊन बाबांनीं पुनः एक रुपया मागितला. मी कमरेस असलेला रुपया दिल्यावर बाबा म्हणाले, 'दे दे पुष्कळ आहेत.' अशा रीतीने अंतर्ज्ञानाने बाबा सर्व जाणत असत.

कृष्णाबाई शा. प्रभाकर.

अखंड सद्रूप संत पूर्ण ज्ञानी । इतर अज्ञानी थोडे फार ॥ १२ ॥
पूर्णज्ञानामध्ये आहे पूर्णानंद । म्हणूनी आनंदमूर्ति सत ॥ १३ ॥
पूर्णानंदामाजी वसे पूर्ण शांति । तिजमाजी वसती सतजना ॥ १४ ॥
अध्यात्मिक ग्रंथ आणि महावाक्ये । सर्वहि अतर्क्ये ब्रह्मात्मक ॥ १५ ॥
नारद शांडिल्य याज्ञवल्क्य व्यास । जैमिनी ह्यां ध्यास अद्वैताचा ॥ १६ ॥
अद्वैतचि वसे गीताभागवतीं । कृष्णाचार्य सतीं वंदिले जे ॥ १७ ॥
श्रीशंकराचार्य विद्यारण्यस्वामी । ह्यांच्या उक्ति नामी सर्वाद्वैती ॥ १८ ॥
यथार्थदीपिका आणि ज्ञानेश्वरी । तेथील वैखरी भिन्न नसे ॥ १९ ॥
मत्स्येंद्र गोरख तुकोबा कबीर । रामदास वीर अद्वैती हे ॥ २० ॥
नामा मुक्ताबाई चोखामेळा सेना । वदती न अन्या वाणी तेही ॥ २१ ॥
मुकुंद तो गोरा आणि एकनाथ । सर्वांचाही पथ अद्वैताचा ॥ २२ ॥
सुजन कसाई जनी मिराबाई । वर्णिताती पाहीं अद्वैताते ॥ २३ ॥
शीळनाथ धोंडी शंकर हे सिद्ध । आणिक प्रसिद्ध योगीराज ॥ २४ ॥
देहबुध्यां दास सर्वही म्हणती । ब्रह्मांशे डोलती जीव बुध्यां ॥ २५ ॥
आत्मत्वे मानिती जीवेशीं अभेद । मुळीं काहीं भेद न अद्वैतीं ॥ २६ ॥
खंडन ग्रंथांत हर्षमिश्र बोले । अपवाद फोले उडविलीं ॥ २७ ॥
हे ज्ञानी तत्त्वज्ञ जरी म्हणो वेडे । तत्त्वज्ञान कोडे उमगी कोण ॥ २८ ॥
जीवन्मुक्त साई ब्रह्मीभूत सदा । ऐसा अनेकदा पाहिला म्या ॥ २९ ॥
ब्रह्म आणि आत्मा एकचि अद्वैत । मायोद्भूत द्वैत तेथें नसे ॥ ३० ॥
ज्ञानी तोचि आत्मा आत्मा तोचि ब्रह्म । तिन्ही ठायीं सम अद्वैतची ॥ ३१ ॥
ऐशा ह्या अद्वैती कर्म आणि कर्ता । ऐशी द्वैतवार्ता न संभवे ॥ ३२ ॥
ब्रह्मात्मभावाने पूर्णाद्वैतीं वास । व्हावा ऐशी आस मनीं वसे ॥ ३३ ॥
रामध्याची आशा पूर्ण करा साई । त्याचे मन पायीं तुमचीया ॥ ३४ ॥

# अज्ञाननिवृत्ति

( अभंग )

द्वैतसिद्धीसाठीं नलगे विचार । जीवव्यवहार सर्व द्वैती ॥ १ ॥
पशु पक्षि आणि कीटकादि जीव । द्वैताचा प्रभाव सर्वाठायीं ॥ २ ॥
द्वैतावांचूनियां नाहीं व्यवहार । परमार्थी सार ते अद्वैत ॥ ३ ॥
दिसे जे ते सत्य हा मानाया न्याय । विवेकाचे काय काज लागे ॥ ४ ॥
"सर्वं खलु इदं ब्रह्म" हे कळेना । ईशकृपेविना कोणासीच ॥ ५ ॥
ईश्वर अमूर्ति कोणाहि दिसेना । त्यामुळेच नाना मतें झालीं ॥ ६ ॥
इंद्रिया दिसेना बुद्धिसी प्रत्यक्ष । विवेकीं जे दक्ष तया सर्वां ॥ ७ ॥
जीव आणि ईश ह्याची एकात्मता । महावाक्य पथा गेल्या होते ॥ ८ ॥
ऐसें ज्ञान नोहे गुरुकृपेवीण । ती लाभाया पूर्ण व्हावी श्रद्धा ॥ ९ ॥
अहंभाव वसे जोंवरी अतरीं । श्रद्धेसी तोवरी थारा नसे ॥ १० ॥
संतरूपे ईश जगीं वसतसे । जाणणे जे ऐसे तीच श्रद्धा ॥ ११ ॥
ऐशिया श्रद्धेने शरण संतासी । गेल्या पातकासीं लागे क्षय ॥ १२ ॥
पापक्षयासवे सत्त्वशुद्धि होते । तेणेचि लाभते **संतकृपा** ॥ १३ ॥
संतकृपा होय माउली ज्ञानाची । करी **अज्ञानाचो होळो** त्वरे ॥ १४ ॥
अज्ञानाच्या नाशे सहज जें ज्ञान । त्याचें **आवरण नष्ट** होते ॥ १५ ॥
**अज्ञानावरण** गेलिया **विक्षेपा** । थारा नाहीं बापा राहण्याला ॥ १६ ॥
विक्षेप गेलिया **परोक्ष जें ज्ञान** । लाभतें तें जाण पाप नाशी ॥ १७ ॥
परोक्ष प्रसवे **शुद्धापरोक्षातें** । जे मूलाज्ञानाते जाळी सर्वां ॥ १८ ॥
**आत्यंतिक दुःखनिवृत्तीची** प्राप्ति । **निरंकुशातृप्ति** त्यानंतर ॥ १९ ॥
ऐशिया लाभासी लाचावूनि साई । आहे तुझ्या पायीं सर्वदा मी ॥ २० ॥
**यज्ञकर्मावीण** सारीच आपदा । यज्ञीं श्रेष्ठ सदा जपयज्ञ ॥ २१ ॥
नामाचेचि दान नामीं एकाग्रता । ती होय तत्त्वतः श्रेष्ठ तप ॥ २२ ॥
यज्ञ दान तप हींच कर्में श्रेष्ठ । इतर कनिष्ठ होती सारीं ॥ २३ ॥
वर्म हें जाणोनी नामीं रत सदा । राहता आपदा सर्व जाती ॥ २४ ॥

भक्तिरूप माझे घेसी देवाऋण । फेडी त्याते कोण तुजविना ॥ २५ ॥
ज्ञानवैराग्य हे मागे मी हो व्याज । इतरत्र काज मला नाहीं ॥ २६ ॥
मुदल ते राहो तुजपाशीं सदा । नको मला कदा त्याची फेड ॥ २७ ॥
" अहं-त्वं " गेलिया ते माझें होईल । जै हाता येईल आत्मज्ञान ॥ २८ ॥
व्याज मिळे तंव अहो साईराया । सोडीना कीं पायां हा रामय्या ॥ २९ ॥

## चिज्जडग्रंथिभेद

( लावणी )

भिद्यते हृदयग्रंथि न्छिद्यंते सर्व संशयाः ।
क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ श्रुतिः ॥
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥

( श्रीमद्भगवद्गीता ४. ३३ )

देह क्षणिकचि क्षणिकचि मन ते प्राण इंद्रिये दहा ।
दाविती **नित्या** न च हीं पहा ॥ १ ॥

शाश्वत **देवा** ह्यांच्याद्वारे कैसा शोधूं तुला
फसविती सदैव सारीं मला ॥ २ ॥

जड हीं अवघीं विश्वहि जड ते **नच** चिच्छक्ती तिथे ।
मिळे ती कैशी दृश्ये इथे ॥ ३ ॥

मायिक दृश्यीं भासे परि ती तद्भिन्नचि तत्वता ।
विवेके उमजे नच अन्यथा ॥ ४ ॥

जडामाजि त्या आनंदाळा ठाव किमपिही नसे ।
तत्त्वता सच्चिन्मय जो असे ॥ ५ ॥

चिदानंद तो अखंड आहे आत्मीं ब्रह्मीं दिसे ।
जडत्वीं किमपिहि नच तो वसे ॥ ६ ॥

सूर्य तमाते तम सूर्याते भेटत नाहीं कदा ।
चिज्जडे भिन्नचि तैशीं सदा ॥ ७ ॥

पय नीरापरि मिश्र होउनी चिज्जड ग्रंथीं वसे ।
तेणे जड सत्यासम दिसे ॥ ८ ॥

अखिल विश्व हे क्षणोक्षणीं कीं चंचल सततचि असे ।
तेथे अचल नित्यता नसे ॥ ९ ॥

समत्व दिसते प्रवाहयोगे एकरूपता नसे ।
अनेकीं ईश्वर नच तो दिसे ॥ १० ॥

चंचल नश्वर भिन्न जगाच्या भासीं ईश्वर नसे ।
जग हे मायामय कीं असे ॥ ११ ॥

जडांश त्यागुनि चिदंश घेता चिन्मयता लाभते ।
मग ती माया नच क्षोभते ॥ १२ ॥

**जीवेशांचें** ऐक्य उमजल्या जड विलया जातसे
अनुभवा ब्रह्मचि मग येनसे ॥ १३ ॥

जीवेशांचे ऐक्य नसे तों मायिक सर्वहि असे ।
जगीं जडतेविण काहीं नसे ॥ १४ ॥

कार्य हेतु जे पंचक ते **जड** त्याचीं कार्यें **तशीं** ।
तीं अध्यात्मिक होती कशा ॥ १५ ॥

बुद्धिहि अध्यात्मिक नोहे जों तों ती त्यागिल कशी ।
जडत्वा भिन्न नसे जे तिशीं ॥ १६ ॥

चिदाभास हा निजरूपाते त्यागुनि आत्मीं मुरे ।
तरिच हा प्रपच सगळा सरे ॥ १७ ॥

चिज्जडग्रंथीच्या भेदाला विराग लागे पुरा ।
तयाविण मार्ग नसे दूसरा ॥ १८ ॥

विवेक अथवा भक्तियोग ह्यां दोंविण निष्ठा नसे ।
जयानें श्रीहरि हृदयीं दिसे ॥ १९ ॥

द्विविधा मार्गी सुलभ भक्ति ती सुसाध्य सर्वां असे ।
जियेनें ईश्वर वश होतसे ॥ २० ॥

क्रमाक्रमानें निजस्वरूपीं मुमुक्षुते न्यावया ।
ईश्वर योजी मार्गद्वया ॥ २१ ॥

निजपद भक्तां उदार द्याया ईश सर्वदा असे ।
कृपणता त्याच्या हृदयीं नसे ॥ २२ ॥

ऐसा करुणासागर हरितो जीवांहृदयीं वसे ।
तयाविण तारक दुसरा नसे ॥ २३ ॥

गुरूस्वरूपें जगीं प्रकटुनी भक्तांते उद्धरी ।
ऐसे वदते तद्वैखरी ॥ २४ ॥

निज हृदयींची खूणगांठ ती भक्तां दावी सुखे ।
अर्जुनासम जे नच पारखे ॥ २५ ॥

ब्रह्मरूप गुरु निजभक्तांतें नेई निष्क्रियपदा ।
प्रपंचा शिवति न मग ते कदा ॥ २६ ॥

माया कार्यचि प्रपंच सारा मायिकत्व ईश्वरीं ।
मुक्तां स्थान तयांच्या शिरीं ॥ २७ ॥

कृपे गुरूच्या ब्रह्मात्मैक्यचि निज हृदयीं जै स्फुरे ।
मुक्तां प्रपंच तेव्हा सरे ॥ २८ ॥

आद्य स्वरूप ईशाचे जे निष्क्रिय होउनि वसे
तेथे मुक्तां वस्ती असे ॥ २९ ॥

ईशाची जी माया शक्ति ईश तियेचा धनी ।
आत्मा मुक्त तियेपासुनी ॥ ३० ॥

ऐशा भाग्या देई जो गुरु तत्पदकमलीं रत ।
व्हावे हेचि हरी सांगत ॥ ३१ ॥

रामय्या हा ह्यास्तव वांच्छी साइपदीं रति सदा ।
अभक्तिच आहे सकलापदा ॥ ३२ ॥

( अभंग )

पूर्णत्वे अज्ञान जडीं सदा वसे । तेथे कांहीं नसे भानाभान ॥ १ ॥
भानाभानभिन्न मिथ्या भान तेहि । जडामाजीं नाहीं कदा काळीं ॥ २ ॥
पंचमहाभूते जडात्मक होती । ऐशीच प्रतीति सर्वां आहे ॥ ३ ॥
पंचभूतात्मक देह तोही जड । प्रकाशे अजड आत्मा त्यांत ॥ ४ ॥
एकादशेंद्रिये पंचभूतात्मक । जडत्वे तीं मूक देहत्रयीं ॥ ५ ॥
प्राण तोही जड तैसेचि विषय । हा आहे प्रत्यय सर्वत्रांना ॥ ६ ॥
स्वभावतः स्वच्छ बुद्धि तीहि जड । प्रकाशे अजड आत्मा तींत ॥ ७ ॥
तोचि **चिदाभास** साधिष्ठान जड । असूनि **चिज्जडग्रंथि** करी ॥ ८ ॥
आत्म्याच्या प्रकाशे होऊनिया बळी । सर्व जीवा छळी चिदाभास ॥ ९ ॥
चिज्जडाची ग्रंथी करी भानाभान । आणि मिथ्याभान तेहि दावी ॥ १० ॥
जडत्वावरण करिते अभान । पोटीं आत्मज्ञान राहे त्याचे ॥ ११ ॥
जड तेचि माया चित्त्व तेचि ब्रह्म । उभयत्वे भ्रम होई जीवा ॥ १२ ॥
**त्रिसत्य** ते **ब्रह्म मिथ्या** सर्व **माया** । जीवा **भ्रम**वाया तीच करीं ॥ १३ ॥
भ्रमेंचि **विक्षेप** होऊनियां जीवा । सत्याचिया भावा येई जग ॥ १४ ॥
अनित्य ते **मिथ्या** नित्य तेचि **सत्य** । हे उमजे तथ्य **आत्मज्ञाने** ॥ १५ ॥
अनित्याच्यापायीं शिणावे किमर्थ । अंतीं सर्व व्यर्थ खटाटोप ॥ १६ ॥
इद्रिया प्रत्यक्ष होतसे जे व्यक्त । आद्यंतीं अव्यक्त ते सारेची ॥ १७ ॥
**देशकालवस्तु परिच्छिन्नताही** । जडामाजी राही सदोदित ॥ १८ ॥
नामरूप सारा उपाधिपसारा । सर्व एकसरा जडात्मक ॥ १९ ॥
उपाधीस आहे उत्पत्ति विनाश । चित्त्व अविनाश स्वतःसिद्ध ॥ २० ॥

जड दिसे भासे ते पंचत्वीं जाते । अदृश्य उरते ते चैतन्य ॥२१॥
चैतन्य अदृश्य न तया आकार । तयासी असार पंचभूते ॥ २२ ॥
उपाधीच्या द्वारे उपाधि पाहता । चैतन्यीं भिन्नता भासतसे ॥ २३ ॥
नाटकी चेटकी मानवाची माया । भुलविते वाया बहुतेका ॥ २४ ॥
मग दुरत्यया ऐशी ईश्वराची । माया वाटे साची सहजचि ॥ २५ ॥
नित्य अशा आत्म्या देहत्रयातीता । कालत्रयातीता कोणी नेणे ॥ २६ ॥
ब्रह्मात्मैक्याचा तो केलिया विचार । माया ती असार वाटे मग ॥ २७ ॥
सत्यज्ञानानंत ऐसे ब्रह्म असे । अखंडत्वे वसे सर्वत्र ते ॥ २८ ॥
सोपाधिक असे तितुकेचि भासे । उपाधीच्या दोषे भिन्नता त्या ॥ २९ ॥
त्रिदेह त्र्यवस्था साऱ्या जडोपाधि । त्यायोगेचि आधीं जीव बद्ध ॥ ३० ॥
स्वप्न जाग्रतीचा एकमेकाठायीं । पूर्णभाव तोहि ठावा सर्वा ॥ ३१ ॥
सुषुप्तीमाजीं त्या द्व्यवस्थाचा भास । नष्ट होतो खास भ्रांति नाहीं ॥ ३२ ॥
जागेपणीं भासे ते स्वप्नीं ना कांहीं । स्वप्नीं दिसे तेहि सर्व मिथ्या ॥ ३३ ॥
नामरूपे सारीं दोहीठायीं सम । सत्यतेचा धर्म कैचा त्यात ॥ ३४ ॥
अल्प काळ भासे स्वप्नीं ते जें खोटे । इतर चोखटे कोण्या न्याये ॥ ३५ ॥
क्षणिकत्व दोन्ही अवस्था भासांना । ऐसेचि सर्वांना स्पष्ट दिसे ॥ ३६ ॥
परिणाम पाहोजाता दोन्हीं ठायीं । समानत्व नाहीं कोण म्हणे ॥ ३७ ॥
स्वप्नातील भोगे इंद्रियाची शांति । होते ही प्रतीति सर्वा असे ॥ ३८ ॥
सुषुप्ति ती जड मोहात्मक साची । माया होय जैशी तैशीच ती ॥ ३९ ॥
तिन्हीहि अवस्था उत्पत्तीस येती । विलयाते जाती प्रतिदिनीं ॥ ४० ॥
त्र्यवस्था पूर्णत्वे नाशवत होत । नित्य ही प्रतीत येते सर्वा ॥ ४१ ॥
पार्थिव जो देह तोचि होय स्थूळ । मनादि चचळ सूक्ष्म देह ॥ ४२ ॥
स्वरूपविस्मृति तेचि मूलाज्ञान । निद्रारूपे जाण ये प्रत्यया ॥ ४३ ॥
अज्ञान **कारण** तदवस्था **निद्रा** । तमाच्या समुद्रामाजीं लोटी ॥ ४४ ॥
**कारणा कारण** ते **महाकारण** । ती **प्रकृति** जाण **ईश्वराची** ॥ ४५ ॥
जन्ममृत्यु भास सत्यत्वे ती दावी । जीवाते भुलवी बुद्धिभेदे ॥ ४६ ॥

स्थूल देहभास जागरणीं असे । स्वप्नामाजी नसे तो कोणासी ॥ ४७ ॥
सूक्ष्मदेहकार्य स्वप्नामाजीं चाले । निद्रेत निमाले राहे तेहि ॥ ४८ ॥
पावती अभासा स्थूलसूक्ष्म देह । तै कारण देह भासतसे ॥ ४९ ॥
सुषुप्ति ती नेणे आपणा इतरां । तमाचा पसारा सारा तींत ॥ ५० ॥
परि निद्रासुख अनुभवी कोण । अनुभवावीण ते न कळे ॥ ५१ ॥
भिन्न अवस्थाचे त्रिदेहीं अभान । परी आत्मज्ञान मुळीं राहे ॥ ५२ ॥
त्रिदेहानुभव घेत असे आत्मा । तोचि परमात्मा सर्वसाक्षी ॥ ५३ ॥
अवस्थाविहीन देहत्रयातीत । ऐसा वसे नित्य सर्वत्र तो ॥ ५४ ॥
एकादशेंद्रिये अंध होती जेथे । स्वप्रकाश तेथे असे त्याचा ॥ ५५ ॥
प्रतिबिंब हेतु सर्वोपाधि शून्य । सर्वत्र अनन्य सदात्मा तो ॥ ५६ ॥
तयाची ती प्राप्ति गुरुकृपेवीण । नोहे हे जाणून ती साधावी ॥ ५७ ॥
यासाठीं जडभाव जाळी साईनाथा । रामय्याचा माथा तुझ्या पायीं ॥ ५८ ॥

## सहजानंद

( साकी )

आनंदाचे स्थान हृदय ते त्याचा विचार आतां ।
शास्त्राधारे करूनियां तो अर्पूं साईनाथा ॥ १ ॥

अखिल जिवांची सारी खटपट नित्यानंदासाठीं ।
तथापि त्याची योग्याविण ती कोणा न पडे गांठी ॥ २ ॥

निद्रा नित्यचि सर्व जिवांना बहु आनदचि देते ।
परि त्या समयीं त्याची कोणा कदापि भेटि न होते ॥ ३ ॥

निद्रावस्थेमाजीं लाभे जे सुख त्याचा जीवा ।
निद्रान्तीं तो आठव होई ऐसे ठावे सर्वां ॥ ४ ॥

विषयांतिल जे श्रेष्ठ गमे सुख त्याविणही बहु जातो ।
काळ परी त्या निद्रेविण तो प्राण नकोसा होतो ॥ ५ ॥

# अध्याय ४७ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः।

।। श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ।।

ज्याचें क्षणैक देखिलया वदन। होय अनंत जन्म दुःखदलन ।।
तें परमानंद जनन स्थान। धन्य श्रीवदन साईचें ।। १ ।।

ज्याचे झालिया कृपावलोकन। तात्काळ कर्मबंधविमोचन।।
स्वानंद पुष्टीं निजभक्तजन। न लगतां क्षण लाधती ।। २ ।।

ज्यांचिया कृपादृष्टीपुढें। कर्माकर्माचे फिटें बिरडें।।
यत्कृपासूर्याचिया उजियेडें। भवखद्योत दडे निस्तेज ।। ३ ।।

जगाचीं पापें भागीरथी धूते। तेणें ती स्वयें मळयुक्त होते।।
सांचला निजमळ निरसावयातें। साधूंचे इच्छिते चरणरज ।। ४ ।।

कधीं साधूंचे पाय लागती। कधीं मजमाजी स्नानार्थ येती।।
त्यावीण निजपापाची निर्गती। नव्हे हें निश्चिती जाणे ती ।। ५ ।।

ऐसिया साधूंचा मु टमणी। समर्थसाई यांची ही वाणी ।।
जाणूनि अत्यादरें भावीक सज्जनीं। आकर्णिजे पावनी ही कथा।।६।।

नवल या कथेचें महिमान। श्रोते सज्ञान वा अज्ञान ।।
परिसतां तुटेल कर्मबंधन। परमपावन कथा हे ।। ७ ।।

नयनांचाही नयन साई । श्रवणांचाही श्रवण पाही ॥
तेणेंचि रिघोनि माझिये हृदयीं । वार्ताजी ही निवेदिली ॥ ८ ॥
साईस्वयें महानुभाव । परिसतां या कथेचा नवलाव ॥
श्रोते विसरतील देहभाव । अष्टप्रेमभाव दाटतील ॥ ९ ॥
साई मुखाची हे कथा । लक्ष लावूनि तीच्या हृद्गता ॥
तात्पर्यावरी दृष्टी ठवितां । कृतकर्तव्यता श्रोत्यांस ॥ १० ॥
तरी विनंती परिसिजे श्रोतां । जरी मी या कथेचा वक्ता ॥
मीही तुम्हांसारिखाच रिता । न घेतां मथितार्थ घेईल ॥ ११ ॥
आठवितां तयाचें भक्तप्रेम । मन विसरे मनोधर्म ॥
होय संसारत्रस्ता उपरम । याहूनि परम लाभ काय ॥ १२ ॥
पूर्वकथेचें अनुसंधान । श्रोतां परिसिजे सावधान ॥
होईल जीवा समाधान । कथा अव्यवधान परिसतां ॥ १३ ॥
गताध्यायाचिये अंतीं । ऐकिली शेळ्यांची कथा श्रोतीं ॥
तयां ठायीं बाबांची प्रीती । गतजन्मस्मृता तयांचीं ॥ १४ ॥
तैसीच आतां हेही कथा । द्रव्यलोभाची परमावस्था ॥
कैसी नेई अधःपाता । सावधानता परिसावी ॥ १५ ॥
साईच पूर्ण कृपादृष्टि । कथा सूचवी उठाउठी ॥
येऊं न देई श्रवणा तुटी । सुख संतुष्टी वाढवी ॥ १६ ॥
कथा वक्ता आणि वदन । स्वयें साई समर्थ आपण ॥
तेथें हेमाड किमर्थ कवण । उगाच टोपण नांवाचा ॥ १७ ॥
बैसला साई कथाब्धितटीं । त्या आम्हा काय कथांची आटाटी ॥
कल्पतरूचिया तळवटीं । कामना उठी तों सिद्धी ॥ १८ ॥

काय दिनकराचिया घरीं । कोण दीपाची चिंता करी ॥
जया अमृतपान निरंतरी । विषाची लहरी काय तया ॥ १९ ॥

असतां आम्हां साईसारिखा । सदैव आमुचा पाठिराखा ॥
वाण काय कथापीयूखा । यथेच्छ चाखा त्या हरिखा ॥ २० ॥

कर्मसूत्र मोठें गहन । कोणासही ना होई आकलन ॥
ठकिजेति महासज्ञान । भावार्थी अज्ञान तरिजेत ॥ २१ ॥

तैसाच दुर्गम ईश्वरी नियम । कोण करील त्याचा अतिक्रम ॥
आचरा नित्य लौकीक धर्म । करावें सत्कर्म सर्वदा ॥ २२ ॥

नाहीं तरी अत्यंत अधर्म । पावूनियां मरणधर्म ॥
जैसें जैसे जयांचें कर्म । पावती जन्म तदनुरूप ॥ २३ ॥

'यथा कर्म यथाश्रुत' । शुक्रबीज समन्वित ॥
कांहीं योनिद्वारीं प्रवेशत । स्थावर भावाप्रत कांहीं ॥ २४ ॥

'यथा प्रज्ञंहि संभवाः' । श्रुत्यर्थ नाहीं कवणा ठावा ॥
जन्म घेणें तरी तो घ्यावा । रुचेल जीवा जो जैसा ॥ २५ ॥

जाणा हे मूढ अविद्यावंत । शरीर गृहणालागी उद्यत ॥
जैसें जयाचें उपार्जित । शरीर प्राप्त तैसें तयां ॥ २६ ॥

म्हणून शरीरपाता आधीं । नरजन्माची अमोळ संधी
दवडी ना जो आत्मबोधावधी । तो एक सुधी जाणावा ॥ २७ ॥

तोच संसार बंधमुक्त । इतर संसार चक्रीं पडत ॥
कधींही शरीरत्वासीं न मुकत । यातना न चुकत जन्माच्या ॥२८॥

आतां या कथेचा नवलाव । दुष्टवृत्तीसीं अंतर्भाव ॥
बुजे मी देह ही आठव । सात्विक अष्टभाव उठतील ॥ २९ ॥